**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०१३</u>**

**वसंत विरुध्द गोपाळा**

**CNR:MHSN14-000335-2013**

## <u>नि.क्र. २२१ वरील आदेश</u>

प्रतिवादी नं. ६ यांचा अर्ज व नि.क्र. २२२ वरील वादीतर्फे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी हे वरचेवर आजारी असल्यामुळे ते कोर्टात हजर न राहू शकलेमुळे त्यांच्याविरुध्द "उलटतपास नाही" चा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द "उलटतपास नाही" असा झालेला आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दिलेला आहे. वादीतर्फे नि.क्र. २२२ वर म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने त्यांनी नाकारलेली असून प्रतिवादीतर्फे मुद्दामहून विलंब केला असून सदर विलंबाबत कोणतेही संयुक्तीक कारण प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेले नाही, तरी प्रतिवादींचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादीच्या विरुध्द "उलटतपास नाही" असा झालेला आदेश रद्द करुन त्यांना उलटतपास घेण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना उलटतपास घेणेची संधी देणे आवश्यक असल्याने प्रतिवादी विरुध्द दिनांक ३१/०३/२०२३ रोजी पारीत केलेला "उलटतपास नाही" असा झालेला आदेश तालुका विधी सेवा समिती, शिराळा यांचेकडे र.रु. २००/- कॉस्ट म्हणून जमा करण्याच्या अटींवर रद्द करण्यात येतो.

PRITI ASHOK SHRIRAM
Digitally signed by PRITI ASHOK SHRIRAM
Date: 2023.04.11 15:51:47 +05'30'

शिराळा (**प्रीती अ. श्रीराम**)

दिनांक १०/०४/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/04/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 10/04/2023 |
| Judgment uploaded on | : | 11/04/2023 |